# दिनांक ३०/०१/२०२० कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या १० व्या बैठकीची टिपणी (Agenda)

## मा. विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली मा.विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, जुने सचिवालय, फोर्ट, मुंबई

## १. मुंबई व मुंबई उपनगरे येथील कांदळवन क्षेत्रातील डेब्रिज हटविण्याबाबत.

<table>
<tr><th>तक्रार क्र.</th><th>तक्रारदार व तक्रारीचा विषय</th><th>तक्रार</th><th>कार्यवाही करणारी यंत्रणा</th></tr>
<tr><td>१</td><td>कांदळवन क्षेत्रातील डेब्रिस काढून टाकणे.</td><td>
• सदरचा विषय हा गेली सहा महिन्यापासून प्रलंबित असल्यामुळे समितीने या विषयावर गार्भीर्याने लक्ष देऊन १४ हेक्टर जागेपैकी खालीलप्रमाणे १०.२२ हेक्टर जागेवरील डेब्रिज हटवून कांदळवनाची लागवड करण्याच्या सूचना दिल्या आहेत.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>गावाचे नाव</th><th>अतिक्रमण तोडलेल्या झोपडी संख्या</th><th>क्षेत्र हे.</th><th>सर्वे नं.</th></tr>
<tr><td>१</td><td>मौजे विक्रोळी</td><td>२६२</td><td>०.३९३</td><td>२०९</td></tr>
<tr><td>२</td><td>मौजे घाटकोपर (छेडानगर/चेंबुर)</td><td>७२८</td><td>०.८९७६</td><td>२३६</td></tr>
<tr><td>३</td><td>मौजे माहिम</td><td>१०५</td><td>०.५</td><td>१०५/ ३४७</td></tr>
<tr><td>४</td><td>मौजे चित्ता कॅम्प</td><td>४५०</td><td>२.०</td><td>१५२</td></tr>
<tr><td>५</td><td>मौजे तुर्भे</td><td>२९०</td><td>०.४३५</td><td>१५२/ १० पैकी</td></tr>
<tr><td>६</td><td>मौजे मालवणी</td><td>१९६</td><td>४.००</td><td>२६३</td></tr>
<tr><td>७</td><td>मौजे मार्वे</td><td>६३</td><td>०.५</td><td>२६३</td></tr>
<tr><td>८</td><td>मौजे कांदिवली</td><td>१८०</td><td>१.५</td><td>१४९</td></tr>
</table>
• त्या अनुषंगाने विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांच्या दि. २९.०८.२०१९ रोजी उपआयुक्त, घनकचरा व्यवस्थापन, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दिलेल्या पत्रानुसार कार्यवाही करण्यास समितीमार्फत आदेश देण्याबाबत शिफारस करण्यात यावी.
</td><td>मुंबई महानगरपालिका<br>महसुल<br>वन<br>म्हाडा</td></tr>
</table>

## २.मागील बैठकीतील तक्रारी.

| अ. क्र. | तक्रारदार व तक्रारीचा विषय | तक्रार | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | **तक्रार क्र. ८**<br>श्री. बी.एस. यादव- दि.२६.११.२०१८<br>KMC-2 Mangrove Destruction<br>Illegal construction of common toilets in malad, | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या अहवालानुसार सदर ठिकाणी कांदळवनालगत अदानी ईलेक्ट्रीसिटी सप्लायचे पाईपलाईन साठी खोदकाम करत असल्याचे निदर्शनास आले. सदरचे खोदकाम हे कांदळवनालगत असल्याने पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अन्वये टाटा पॉवर स्टेशनचे संबंधीत अधिकारी व अदानी | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>**(अहवाल प्राप्त)** |

| | | | |
|---|---|---|---|
| | puming state and tata power station in Malvani, Malad. | ईलेक्ट्रीसीटी सप्लाय कंपनीचे सुपरवायझर श्री. सतीश माळी यांचे विरुध्द गुन्हा क्र. ३३७/२०१९ दि. २५.०६.२०१९ रोजी दाखल करण्यात आलेला आहे.<br>• त्या अनुषंगाने ही तक्रार बंद करण्यास शिफारस करण्यात येत आहे. | |
| २ | **तक्रार क्र. ९**<br>श्री. जयेश गुप्ता – दि.२४.११.२०१८<br>Destroying mangroves in the CRZ Creek ara of Sabe- Desai-Khardi Gaon, Thane. | • या तक्रारी संदर्भात ठाणे महानगरपालिकेने दिवा खार्डी डंपिंग ग्राऊंड यांचे शास्त्रीय दृष्टया Closure करण्यासाठी (National Environmental Engineering Research Instituted) यांना सल्लागार म्हणून नेमले आहे व त्या अनुषंगाने पहिल्या टप्प्यामध्ये एकूण ५ हेक्टर जागेसाठी Biocapping पध्दतीने Scientific Closure करण्यासाठी संबंधित संस्थेने अहवाल सादर केलेला असून त्यानुसार ठाणे महानगरपालिके तर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल असा अहवाल दिला आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदर जागेवरील उर्वरित कार्यवाही तात्काळ करुन त्या बाबतचा अहवाल सादर करण्याच्यास सूचना ठाणे महानगरपालिकेच्या प्रतिनिधींना दिल्या. | आयुक्त ठाणे महानगरपालिका<br><br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ३ | **तक्रार क्र. १२**<br>श्री. लुक मेंन्डीस दि.३०.११.२०१८<br>Mangroves under threat at Bandra east below Mahim-Sion link way. | • सदरची तक्रार बऱ्हेच महिने प्रलंबित असून सदर जागेवरील डेब्रिज हटविण्याची कार्यवाही अद्याप झालेली नाही असे समितीच्या निदर्शनास आले.<br>• सदर जागेवरील डेब्रिज १५ दिवसात हटवून सदर जागेवर कांदळवनाची लागवड करण्याच्या सूचना दिल्या होत्या. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ४ | **तक्रार क्र. १७** श्री.धिरज परब, दि.०५.१२.२०१८<br><br>सेव्हन इलेव्हन हॉटेल कं. ने मीरा रोड कनकिया येथे कांदळवनाची तोड करुन माती भराव व कुंपण भिंत बांधकाम केल्याबाबत. | • या तक्रारी संदर्भात पूर्वी चार FIR दाखल करण्यात आलेले असून पुन्हा दि. २१.०९.२०१९ रोजी नरेंद्र मेहता यांच्या विरुध्द FIR दाखल करण्यात आला आहे असे पोलीस अधिकारी ठाणे ग्रामीण यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने FIR ची तपासणी पूर्ण झाल्यावर पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना तहसिलदार ठाणे यांच्यामार्फत करण्यासाठी उप समितीला १ महिन्याची मुदत देऊन Chargsheet न्यायालयात दाखल करुन त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.<br>• तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या दि.१३.११.०१९ रोजीच्या अहवालानुसार मिरा रोड कनकिया येथे कांदळवनाची तोड करुन माती भराव व कुंपण भिंत बांधकामाबाबत आपल्यामार्फत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने मौजे नवघर येथील सर्वे क्र. ६७, ८१ व ५२ या ठिकाणी कांदळवन नसून सदर ठिकाणी सदर जागा मंजूर विकास योजनेप्रमाणे नाविकास विभागात समाविष्ट असून विकास योजना रस्त्याने बाधीत आहे.<br>• त्या अनुषंगाने या कार्यालयामार्फत सदर जागेची तपासणी केली असता या जागेवरील क्लब जवळील नवीन सर्वे क्र. ५०,५१,८६ व ६९ हे MRSAC २००५ च्या | जिल्हाधिकारी, ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नकाशानुसार सदर ठिकाणी कांदळवन अस्तित्वात होते त्यामुळे सदरची जागा ही सेव्हन इलेव्हन हॉटेल कंपनीच्या मालकीची आहे कि नाही तसेच सदर ठिकाणी केलेला भराव कोणामार्फत झालेला आहे याची चौकशी करणे आवश्यक करण्याचे निर्देश समितीने मिरा-भाईंदर महानगरालिका यांना दिले. | |
| ५ | **तक्रार क्र. ७७** श्री. धिरज परब:- मीरा भाईंदर महापालिका हद्दीतील मीरारोड पश्चिम येथे नाझरेथ आगर परिसरात सरकारी व खाजगी जागेत कांदळवन पाणथळ चा ऱ्हास करून CRZचे उल्लंघन.<br>पाणथळ समितीकडून कांदळवन समितीकडे वर्ग केलेली तक्रार | • आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या दि.१३.११.२०१९ रोजीच्या अहवालानुसार सदर ठिकाणी रस्ता बनविण्यात आलेला असून नारळाची झाडे लावलेली आहेत व रस्त्याच्या बाजूला कांदळवनाची झाडे आहेत. सध्यस्थितीत सदर ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास झालेला नाही. व MRSAC नकाशानुसार सदर क्षेत्र हे कांदळवन नसल्याचे दिसते.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत पुढील कार्यवाही करुन Chargsheet दाखल करण्याचे निर्देश दिले. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका,<br>जि. ठाणे.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ६ | **तक्रार क्र. ७८**<br>श्री. धिरज परब - मीरारोडच्या कनकिया भागात सर्वे क्र. ३८ मध्ये पाणथळ, कांदळवन, सीआरझेड मध्ये पर्यावरणाचा ऱ्हास केले बाबत.<br>पाणथळ समितीकडून कांदळवन समितीकडे वर्ग केलेली तक्रार | • या तक्रारी संदर्भात आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या दि. १३.११.२०१९ रोजीच्या अहवालानुसार दि.१०.१०.२०१८ रोजी तक्रारदार यांच्या समक्ष पाहणी केली असता मौजे नवघर सर्वे क्र. ३८ क्लब हाऊस च्या पाठीमागील क्षेत्र हे मीठ अधिक्षक, सॉल्ट विभाग यांच्या ताब्यात असल्याचे निदर्शनास आले. परंतु प्रत्यक्ष जागेवर दि. ४.११.२०१९ रोजी पाहणी केली असता जागेवर कोणत्याही प्रकारचे नवीन बांधकाम केल्याचे निदर्शनास आलेले नाही.<br>• सदर ठिकाणी विरळ प्रमाणात कांदळवनाची झाडे आहेत.<br>• सदर ठिकाणी पाण्याचे प्रवाह काही ठिकाणी बंद झाले आहेत ते प्रवाह पुन्हा सुरु करण्याचे निर्देश समितीने दिले. | तहसिलदार, ठाणे<br>(जिल्हाधिकारी ठाणे)<br>मिरा-भाईंदर महानगरपालिका –<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ७ | **तक्रार क्र. ७९**<br>श्री. धिरज परब: - मीरा भाईंदर महापालिका हद्दीतील नवघर गाव मागील सरकारी खाजण सर्वे क्र. १५ मध्ये मनपाने पाणथळ, कांदळवन व सीआरझेड १ मध्ये बेकायदा टाकलेला कचरा, भराव काढून कांदळवनाची लागवड.<br>पाणथळ समितीकडून कांदळवन समितीकडे वर्ग केलेली तक्रार | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी ठाणे यांच्या प्रतिनिधींनी सदर ठिकाणी नवीन निदर्शनास आलेली कच्ची बांधकामे, झोपडपट्टया काढून टाकण्यात आलेली आहेत व इतर CRZ बाधीत अनधिकृत बांधकामे निष्कासीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.<br>• समितीने सदर ठिकाणी पुन्हा एकत्र स्थळ पाहणी करण्याच्या सूचना दिल्या व सदर जागेवर Restoration Plan तयार करुन त्या बाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | तहसिलदार ठाणे<br>(जिल्हाधिकारी ठाणे)<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ८ | **तक्रार क्र. १८**<br>उत्कर्ष सार्वजनिक मित्र मंडळ वेबसाईटद्वारा प्राप्त तक्रार KMC-3 दि.०३.१२.२०१८<br>Mangroves Cutting in Gorai Sector 2 | • या तक्रारी संदर्भात SDO मुंबई उपनगर यांनी सदर ठिकाणी कांदळवन आहेत यापूर्वी सदर ठिकाणी डेब्रिज टाकल्यामुळे अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.<br>• त्या अनुषंगाने कांदळवनाच्या संरक्षण करण्याच्या दृष्टीने सदर ठिकाणी भराव होऊ नये | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. मुंबई महानगरपालिका<br>**(अहवाल अप्राप्त)** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | यासाठी CCTV कॅमेरा बसविण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश समितीने दिले आहेत. | |
| ९ | **तक्रार क्र. २१**<br>श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार<br>दि.०९.१२.२०१८<br>Sion Panvel Highway work damaging Mangroves. | • तहसिलदार ठाणे यांच्या अहवालानुसार Highway जवळ कांदळवनाचे नुकसान झालेले नाही परंतु सदर जागेवर कांदळवनालगत डेब्रिज टाकण्यात आलेले आहे.<br>• तसेच सदरची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी कार्यकारी अभियंता, PWD यांना बैठकीत उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आहे. परंतु सदरची कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे. | जिल्हाधिकारी ठाणे<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| १० | **तक्रार क्र. ८३**<br>श्री.बी.एन. कुमार ०१.०८.२०१८<br>Mangrove killing along Sion-Panvel highway - Request for rapid action force. | | |
| ११ | **तक्रार क्र. ९८ श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार दि.०६.०८.२०१९.**<br>Debris mafia shifts goalposts on Sion Panvel Highway – Chembur. | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी सदरची जागा ही सॉल्ट विभागाची असून सॉल्ट आयुक्तांना कांदळवन ऱ्हासाबाबत कळविले असल्याचे सांगितले.<br>• परंतु समितीने सदरची जागा सॉल्ट विभागाची असली तरी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्यामार्फत सदर जागेची स्थळ पाहणी करुन डेब्रिज हटविण्याकरीता योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२.निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| १२ | **तक्रार क्र. ३७**<br>श्री. नंदकुमार पवार- दि.१९.०६.२०१८<br>2) Coastal road - There are huge patches of mangroves have found dead either side of the coastal road by blocking of tidal water flow. | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी, रायगड यांच्या प्रतिनिधींना कांदळवनाच्या तोडीबाबत २०१८ रोजी दाखल केला आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींना सदर जागेची केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, FIR प्रत व Restoration बाबत योग्य नियोजन तयार करुन समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सदस्य सचिवांकडे सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी रायगड<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| १३ | **तक्रार क्र. ८८** श्री. नंदकुमार पवार. दि. ३०.०७.२०१९<br>Chopping of mangroves stretch at pagote, Uran | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी, रायगड यांच्या प्रतिनिधींना समितीने FIR ची कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नाही असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींना सदर जागेची केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, FIR प्रत व Restoration बाबत योग्य नियोजन तयार करुन समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सदस्य सचिवांकडे सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, रायगड<br>२. सिडको, नवी मुंबई.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| १४ | **तक्रार क्र. ९२** श्री. नंदकुमार पवार. दि. ३०.०७.२०१९<br>उरण तालुक्यामध्ये विकास व पायाभूत सुविधांच्या नावाने होणाऱ्या खाजण जमीनी व न भरुन येणाऱ्या पर्यावणाच्या | समितीने या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींनी आणि सिडको यांच्या प्रतिनिधींना योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व Restoration बाबत योग्य नियोजन तयार करुन १५ दिवसात समितीपुढे सादर | १. जिल्हाधिकारी, रायगड<br>२. सिडको, नवी मुंबई.<br>**(अहवाल अप्राप्त)** |

| | | | |
|---|---|---|---|
| | ऱ्हासासंबंधी आपले लक्ष वेधणेबाबत. | करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | |
| १५ | **तक्रार क्र. ९३** श्री. नंदकुमार पवार. दि. २८.०८.२०१९<br>Municipal solid waste dumping on Mangroves | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी, रायगड यांच्या प्रतिनिधींनी सदर ठिकाणी JNPT अंतर्गत सदरची जागा असून त्या ठिकाणी सध्या कांदळवनाची तोड झालेली नाही .<br>• परंतु सदर ठिकाणी भराव झालेला असल्याने समितीने सदर जागेवरील नगरपरिषदेला सदरचा भराव काढण्यासाठी निर्देश जिल्हाधिकारी रायगड व सिडको यांच्या प्रतिनिधींना दिले आहेत. | १. जिल्हाधिकारी, रायगड<br>२. सिडको, नवी मुंबई.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| १६ | **तक्रार क्र. २४** श्री. दिपक कामथ - दि.०९.१२.२०१८<br>Potential illegal work near mangroves within Chheda Nagar area.<br>**तक्रार क्र. ६८** श्री. नंदकुमार पवार. दि.१४.०४.२०१९<br>New illigal slum development at chheda Nagar reserved forest land near Jijamata Bhosle Marg junction. Chembur. | • या तक्रारी संदर्भात समितीने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींना सदर जगोवरील सर्वे नंबर बदलून सदरची जागा वन विभागास हस्तांतरीत करण्यास सांगितले व त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, मुंबई महानगरपालिका आणि वन विभाग<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| १७ | **तक्रार क्र. २७**<br>श्री. डेबी गोएंका - दि.१२.१२.२०१८<br>Destruction of mangroves by INS Hamla at Marve. | • या तक्रारी संदर्भात अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या बैठकीत देखील चर्चा करण्यात आली होती तसेच आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिके मार्फत देखील स्थळ पाहणी झाली आहे तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी Contractor विरुध्द FIR दाखल करण्यात आली आहे असे सांगितले.<br>• तसेच समितीमार्फत नेवीच्या अधिकाऱ्यांना वन (संवर्धन) अधिनियम (FCA) प्रस्ताव मागविण्यात आला होता परंतु अद्याप प्राप्त झालेला नाही.<br>• समितीने या तक्रारीबाबत समितीने अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या बैठकीत सदरचा विषयाबाबत चर्चा झाल्यानुसार त्यांच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| १८ | **तक्रार क्र. २९** श्री. सुनिल अगरवाल - दि.१५.१२.२०१८<br>Destruction of Mangroves by Janakidevi Public School in Andheri (west) | • समितीने SDO मुंबई उपनगर आणि मुंबई महानगरपालिका यांच्यामार्फत सदर जागेवर कांदळवनाची लागवड किंवा इतर झाडे लावण्याबाबत नियोजन करण्याच्या सूचना दिल्या होत्या. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर<br>२. मुंबई महानगरपालिका<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| १९ | **तक्रार क्र. ५६**<br>श्री. सुनिल अगरवाल –दि.12.02.2019<br>Systematic Destruction of Mangroves in Nerul Seawoods behind TSC maritime institute. | • या तक्रारीबाबत सिडको यांच्या अधिकाऱ्यांनी तक्रारदारासोबत दि.०७.०९.२०१९ रोजी स्थळ पाहणी करण्यात आली असून सदर ठिकाणी कांदळवनाजवळ डेब्रिज टाकण्यात आले आहे.<br>• सिडको कंपाऊंडच्या बाजूला असलेले डेब्रिज काढण्यात आले आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल देण्याच्या | सिडको<br>**(अहवाल अप्राप्त)** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सूचना समितीने दिल्या आहेत. | |
| २० | **तक्रार क्र. ३०**<br>श्री. विनोद पुन्शी- दि.१७.१२.२०१८<br>Effluents released in mangroves raise a stink-<br>T.O. I. Navi Mumbai Report dated 16.12.2018 | • समितीने या तक्रारीबाबत MPCB च्या नोडल अधिकाऱ्यांसोबत स्थळ पाहणी करण्यास सांगितले व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना मागील बैठकीत दिल्या होत्या. परंतु MPCB मार्फत कोणीही प्रतिनिधी उपलब्ध नसल्याने तक्रार अद्याप प्रलंबित आहे. | जिल्हाधिकारी ठाणे<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| २१ | **तक्रार क्र. ८६ श्री. विनोद पुन्शी -दि ०९.०५.२०१९**<br>Wetland being filled up overnight Near Indian Institute of Geo magnetism campus.<br>कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीकडून प्राप्त तक्रार | • या तक्रारी संदर्भात सिडको यांच्या प्रतिनिधींनी सदर जागेवर स्थळ पाहणी झाली असून सदर ठिकाणी असलेला भराव हा काढण्याची प्रक्रिया सुरु आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारी बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | सिडको आणि आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका –<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| २२ | **तक्रार क्र. ९९ श्री. विनोद पुन्शी दि.२०.०९.२०१९**<br>T.O.I. Navi Mumbai report on 20/09/2019 regarding mangroves destruction off S-P adjacent to Roadpali road. | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी, रायगड यांच्या प्रतिनिधींनी सदर जागेवरील भराव काढण्यात आला आहे असे सांगितले.<br>त्या अनुषंगाने समितीने या तक्रारी बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | १. जिल्हाधिकारी, रायगड जि. रायगड<br>२. सिडको, नवी मुंबई.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| २३ | **तक्रार क्र. ४९**<br>श्री. रेजी अब्राहम दि. 16.1.2019<br>Mangroves destruction –Illegal chawl construction in Charkop<br>चारकोप, कांदिवली (पश्चिम) | • या तक्रारी संदर्भात उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांच्या दि.१९.०९.२०१९ रोजीच्या अहवालानुसार लक्ष्मीनगर ते डिंगेश्वर मंदिर या अर्धवर्तुळाकार भागात कांदळवनापासून ५० मीटरच्या आत अनेक अनधिकृत बांधकामे, झोपडया दिसून आले आहेत.<br>• त्याप्रमाणे जलाराम मंदिर येथील भागात सुध्दा कांदळवनापासून ५० मीटर क्षेत्राच्या आत अनधिकृत बांधकामे, झोपडया, दुकानांचे गाळे दिसून आले आहेत.<br>• तसेच सदर ठिकाणी रस्त्याच्या पूर्व बाजूस इमारती आहेत. सदर जागेवर कांदळवनाची तोड झाल्याचे दिसून येत नाही. सदर जागेच्या दक्षिणेस नाला गेलेला असून सदर नाल्यालगत डेब्रिज टाकण्यात आलेला आहे.<br>• सदर जागेची द्रोण द्वारे छायाचित्रांची तुलना केली असता सन २००५ मधील कांदळवन क्षेत्र आज रोजी कमी झालेले दिसून येत नाही. तसेच भविष्यात सदर ठिकाणी कांदळवनाचे काही नुकसान होणार नाही व कांदळवनापासून ५० मीटर बफर क्षेत्रात अनधिकृत बांधकाम होणार नाही यांची दक्षता घेण्यास समितीने सांगितले. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |
| २४ | **तक्रार क्र. ५० श्री. रेजी अब्राहम** – दि.16.1.2019<br>Mangroves destruction चारकोप, (पश्चिम) | | |
| २५ | **तक्रार क्र. ५१** श्री. रेजी अब्राहम - दि.19.1.2019<br>Mangroves destruction – Tipusultan Ground CTSno. 28412 मालवणी, मालाड(पश्चिम) | | |
| २६ | **तक्रार क्र. ५३** श्री. रेजी अब्राहम –दि.31.01.2019<br>Dheeraj Bhandari regular land Mafia of charkop village , nonchalantly continues building his huge illegal ground floor plus one above room chawl ( 17rooms plus 17 rooms ) each room of 200 sq feet behind Jalaram temple in charkop village in violation | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | **तक्रार क्र. ५४** श्री. रेजी अब्राहम दि.02.02.2019<br>No necessary visit much less action so far by BMC R SOUTH WARD, collector western suburbs, mangroves cell, deputy collector encroachment nor charkop police station with regard to ongoing illegal chawl construction in CRZ restricted mumbai high court. | | |
| २८ | **तक्रार क्र. ९४** दि.०१.०९.२०१९ श्री. रेजी अब्राहम<br>Site visit by SDO and other enforcement authorities at malad malwani, lagoon road, CTS no 2841, S.no 263 on 21.07.2019 following our complaint and consequent directions by high court monitored state mangroves monitoring committee. | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| २९ | **तक्रार क्र. ९५** दि.१२.०९.२०१९ श्री. रेजी अब्राहम<br>Request strong action against concerned officials (Revenue, BMC (P north SWM department), malwani police station and mangroves cell) for overlooking timely action in spite of first complaint on 01.02.2018(mcc2017-43) and last complaint on 09.09.2019. | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ३० | **तक्रार क्र. ६२** दि.८.०३.२०१९ श्री. हरेश नरेश कडू गोफण नदी किनारी असणारे कांदळवनाची (खारफुटी) व झाडांची बेकायदेशीर तोड केल्याबाबत. | • या तक्रारी संदर्भात वन विभाग रोहा यांच्या दि.१३.०५.२०१९ अहवालानुसार तोड झालेले ठिकाण हे वन विभागाच्या ताब्यातील नसून ते मालकी क्षेत्रात असल्याचे निदर्शनास आले आहे.<br>• या तक्रारी बाबत उपवनसंरक्षक, वन विभाग रोहा, यांनी गुन्हा दाखल करण्याकरीता पोलीस निरीक्षक यांना कळविण्यात आले आहे. | १. जिल्हाधिकारी, रायगड<br>२. सिडको, नवी मुंबई.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ३१ | **तक्रार क्र. ६५** श्री. सुबीर वर्मा - दि.२७.०३.२०१९<br>Dumping to claim mangrove Land, Thane. | • तहसिलदार ठाणे यांच्या दि. ०५.११.२०१९ रोजीच्या अहवालानुसार मंडळ अधिकारी बाळकुम यांनी अर्जदार यांचे समवेत दि. २९.६.२०१९ रोजी प्रत्यक्ष जागेवर जाउुन पाहणी केली असता सदर जमिनीवर मोठया प्रमाणात डेब्रिजचा भरणा केलेला असून जमीन भरणी करत पुढे पुढे वाढवत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. | जिल्हाधिकारी, ठाणे. |
| ३२ | **तक्रार क्र. ६७** श्री. वैभव – दि. २९.०३.२०१९<br>तलाठी सजा मौजे जूचंद्र तालुका - वसई जि. पालघर येथील सर्व्हे ८५ हिस्सा नं. ५ बी | • जिल्हाधिकारी, पालघर यांच्या प्रतिनिधींनी या तक्रारी बाबत सुनावणी दि.२४ सप्टेंबर २०१९ रोजी तहसिलदार वसई यांच्या सोबत असल्यामुळे तक्रार प्रलंबित आहे असे सांगितले. | जिल्हाधिकारी पालघर<br>**(अहवाल अप्राप्त)** |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | **तक्रार क्र. ६९** श्रीम. आदिती प्रधान दि.२०.०४.२०१९<br><br>Debris dumping in Lokhandwala Mangrove in Andheri West | • या तक्रारी संदर्भात विभागीय वन अधिकारी, मु.का.सं.घ यांच्या दि. १४.०५.२०१९ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार सदर ठिकाणी वर्सोवा सर्व्हे नं. १२० न. भुक्र. १३७१ मधील लोखंडवाला बॅक रोड डम्पींग ग्राउंडकडे जाण्याच्या रस्त्यावर रात्रीच्या वेळी डम्पींग झाल्याचे दिसते.<br>• या तक्रारी संदर्भात तक्रारदाराशी संपर्क न झाल्याचे जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी सांगितले तसेच सदरची जमीन ही म्हाडा विभागाची असून तेथे असलेले डेब्रिज काढण्यासाठी महानगरपालिकेला कळविण्यात आले आहे व सदर जागेवरील Restoration म्हाडा विभागामार्फत करण्याच्या सूचना समितीने दिल्या.<br>• या तक्रारी संदर्भात १५ दिवसाच्या आत डेब्रिस काढून अहवाल सादर करावा. तसेच समितीने कांदळवन क्षेत्राच्या ठिकाणी C.C.TV लावून घ्यावेत असे निदेश मा. अध्यक्ष यांनी बैठकीत दिले. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ३४ | **तक्रार क्र. ७५**<br>**Environment Activitist.**<br>Dumping of C & D Waste, Cutting of Mangroves and Destruction of the Wetland in Village Kasheli Tal. Bhiwandi Dist. Thane. | • या तक्रारी संदर्भात तहसलिदार, ठाणे यांच्या अहवालानुसार सदर जमिनीवर भातशेतीचे खाचरे दिसून आले. तथापी सदर स.नं. चे बाजूस खार फुटीची विरळ प्रमाणात झाडे असल्याचे दिसून येते तसेच डेब्रिज भरणी केलेल्या जमिनीमध्ये मॅग्रोज प्रजातीच्या झाडांचा ऱ्हास झाल्याचे दिसून येत नाही.<br>• त्या अनुषंगाने सदरची तक्रार बंद करण्यास शिफारस करण्यात येत आहे. | जिल्हाधिकारी ठाणे<br><br>तहसिलदार ठाणे<br>**(अहवाल प्राप्त)** |
| ३५ | **तक्रार क्र. ८०**<br>श्री. बद्री चॅटर्जी:- Wetland reclamation at, opposite of Cielo, LODHA spendora, Bhayander pada, Ghodbandar road, Thane.<br>पाणथळ समितीकडून कांदळवन समितीकडे वर्ग केलेली तक्रार | • ठाणे महानगरपालिका यांच्या दि. १६.०९.२०१९ रोजीच्या अहवालानुसार सदर ठिकाणी दि. ०८.०७.२०१९ रोजी स्थळ पाहणी झाली असून या ठिकाणी २००५ साली कांदळवन होते का याबाबत माहिती नाही. परंतु २००५ च्या गुगल इमेजनुसार सदर ठिकाणी भात शेती दिसत आहे.<br>• तसेच शहर विकास विभागाच्या अभिप्रायानुसार सदर भुखंडांबाबत शासनाकडून प्राप्त झालेल्या २००५ सालचे CZMP नकाशानुसार मौजे भाईंदरपाडा स.नं. ३७ पै या जमिनीचे क्षेत्र CRZ च्या तरतूदीने बाधित नाही.<br>• त्या अनुषंगाने सदरची तक्रार बंद करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे. | जिल्हाधिकारी ठाणे<br><br>**(ठाणे महानगरपालिका अहवाल प्राप्त)** |
| ३६ | **तक्रार क्र. ८१**<br>हिंद सागर –<br>**दि २९.०५.२०१९**<br>भाईंदर पश्चिम रेल्वे स्टेशन जवळ CRZ च्या मोकळया जमीनी वर माती भराव बंद करणेबाबत. | • समितीने या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी, ठाणे आणि मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना एकत्र स्थळ पाहणी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.<br>• कांदळवना लगत भरणी झालेली आहे असे तहसिलदार ठाणे यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारी बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना तहसिलदार ठाणे यांना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी ठाणे आणि मिरा-भाईंदर महानगरपालिका –<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ३७ | **तक्रार क्र. ८२**<br>श्री. प्रसाद खाले ११.०६.२०१९ Destruction of Mangroves by dumping of debris and reclamation at Kharegaon, Kalwa | • ठाणे महानगरपालिका यांच्या दि.१६.०९.२०१९ रोजीच्या अहवालानुसार सदर ठिकाणी दि. ०८.०७.२०१९ रोजी स्थळ पाहणी झाली असून सदर ठिकाणी बऱ्याच प्रमाणात भरणी आढळली. २००५ साली सदर ठिकाणी कांदळवन होते का याबाबत | जिल्हाधिकारी ठाणे आणि<br>**(ठाणे महानगरपालिका अहवाल प्राप्त)** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उपवनसंरक्षक ठाणे, वन विभाग यांना पत्र देण्यात आले आहे.<br>• तसेच २००५ च्या गुगल इमेजेसनुसार या ठिकाणी भात शेती दिसत आहे.<br>• शहर विकास विभागाच्या अभिप्रायानुसार स.नं. ६० पै या जमिनीचे CRZ II च्या तरतूदीने बाधित आहे.<br>• समितीने या तक्रारी बाबत पुन्हा स्थळ (Verify) करण्यास ठाणे महानगरपालिकेच्या प्रतिनिधींना सांगितले. | |
| ३८ | **तक्रार क्र. ८५**<br>श्री. दिनार कृष्णा म्हात्रे- दि. ११.०७.२०१९<br>कांदळवनाची बेसूमार तोड करुन पर्यावरणाचा ऱ्हास केल्याबाबत. | • सदरची तक्रार पुढील कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी, पालघर यांना पाठविण्यात आली असून समितीने या तक्रारी बाबत स्थळ पाहणी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी पालघर यांच्या प्रतिनिधींना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी पालघर<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ३९ | **तक्रार क्र. ८७ श्री.स्टॅलिन डी. दि.२१.०७.२०१९**<br>Wall being constructed next to the mangroves. | • सदरची तक्रार पुढील कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना पाठविण्यात आली आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ४० | **तक्रार क्र. ८९** श्री. जतीन दधीच दि. ०४.०८.२०१९<br>Destruction of mangroves, illegal land filling and construction of Chawl (10 rooms) at Government Land , Shivneri , Village Rai , Bhayander West , by Land / Chawl Mafia Pravin Tiwari and Meghnath Patil. | • या तक्रारी संदर्भात आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या दि. १३.११.२०१९ रोजीच्या अहवालानुसार सदर जागेची पाहणी केली असता सदर बांधकाम हे कांदळवन तोडून केल्याचे आढळून आलेले नाही. सदरच्या बांधकामावर दि. १९.०७.२०१९ रोजी तोडक कारवाई करण्यात आली होती. परंतु सदर जागेवर पुन:श्च १० रुमचे बांधकाम केल्याचे तसेच सदरचे बांधकाम हे रहिवासी व्याप्त झाल्याचे आढळून आलेले आहे.<br>• सदरचे बांधकाम हे महसूल विभागाच्या जागेवर असल्यामुळे अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करीता महसूल विभागास कळविण्यात आले आहे. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर मनपा, जि. ठाणे.<br>३. सहाय्यक वनसंरक्षक, ठाणे.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ४१ | **तक्रार क्र. ९०** श्री. के.एस. शुल्का - दि. १३.०८.२०१९<br>Debris and Garbage dumping in the Creek and on the Mangroves in Sector-11, Belapur | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर मनपा, जि. ठाणे.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ४२ | **तक्रार क्र. ९१** श्रीमती. श्वेता भट दि. १३.०८.२०१९<br>Destruction of Mangroves at Mankhurd, Mumbai, by Yogayatan Ports Pvt. Ltd. | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ४३ | **तक्रार क्र. ९७ श्री. आरीफ इराकी दि.०९.०८.२०१९**<br>Complaint against the Collector of thane for causing Contempt of Court for their no action against illegall sand mining and thereby abetting | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी ठाणे<br>**(अहवाल अप्राप्त)** |

| | | | |
|---|---|---|---|
| | to the destruction of mangroves and environment at Mumbra Creek (Along Ulhas River) At Retibunder and Desai Khadi near Chuha Pal in Diva, Thane. | | |
| ४४ | **तक्रार क्र. १००** श्री. धिरज परब -दि.14.10.2019 भाईंदर पश्चिम येथे बजरंग नगर भागात महापालिकेने कांदळवन क्षेत्रात बेकायदेशीर भराव करून काँक्रीट टाकी, स्लॅब टाकून शौचालयाचे बांधकाम केल्या प्रकरणी. | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका |
| ४५ | **तक्रार क्र. १०१** श्री. दिपेश म्हात्रे दि. 06.11.2019 DUMPING OF CITY WASTE ON MANGROVE. | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी, रायगड<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ४६ | **तक्रार क्र. १०२** बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार दि.07.11.2019<br>Uran mangrove zone turns into massive garbage dumping ground | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी, रायगड<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ४७ | **तक्रार क्र. १०३** श्री. शैलेश राव दि. 15.11.2019<br>Landfilling of mangroves and also illegal destruction in Madh, Malad(w) Mumbai 400061 | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ४८ | **तक्रार क्र. १०४** श्री. धिरज परब दि.19.11.2019 भाईंदर पश्चिम येथे एसटी डेपोच्या आरक्षणातील कांदळवन नष्ट करून झाडे तोडणे तसेच बेकायदा डेब्रिस चा भराव व थर्माकोल आदींचा कचरा टाकून पर्यावरणाचा ऱ्हास केल्या प्रकरणी | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ४९ | **तक्रार क्र. १०५** श्री. धिरज परब दि. 05.03.2019 चौक जेट्टी जवळ बालेपीर शाह दर्गा लगत कांदळवन व सरकारी जागेत पर्यावरणाचा ऱ्हास. | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ५० | **तक्रार क्र. १०६** श्रीमती सुप्रीया रेघे दि. 05.12.2019<br>Garbage and debris in mangroves | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>**(अहवाल अप्राप्त)** |

| | | | |
|---|---|---|---|
| ५१ | **तक्रार क्र. १०७** हिंद सागर दि. २८.११.२०१९<br>जिल्हा ठाणे भाईंदर पश्चिमेच्या उत्तम रोड, जय बामन देव नगर, मुर्धा खाडी जवळील नाल्या शेजारी रामवृक्ष चौधरी नामक भु माफियाद्वारे अवैध्य रित्या कांदळवनाची तोड करुन (एका खोलीचे) बांधकाम केल्याबाबत. | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ५२ | **तक्रार क्र. १०८ श्री. रोहीत जोशी दि.०८.१२.०१९**<br>ठाणे महानगरपालिकेतर्फे कळवा येथील कंदळवनांची कत्तल | • या तक्रारी बाबत ठाणे महानगरपालिका यांच्या अहवालानुसार कळवा प्रभाग समिती क्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालया शेजारी रेल्वे ट्रॅक लगत सर्वे क्र. ४२५ स्पोर्टस् कॉप्लेक्स विकसीत करण्याचे काम ठाणे महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आलेले आहे. सदर कामास मे. बिलीव्ह इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.ली. यांना काम सुरु करण्याचे आदेश देण्यात आले आहेत व राज्य पर्यावरण प्रभाव आकलन प्राधिकरण (SEIAA) या विभागाकडील मान्यता प्राप्त झालेली आहे.<br>• सदर कामाच्या ठिकाणी मोठया प्रमाणात अनधिकृत शेड व व्यवसाय सुरु होते. तसेच मोठया प्रमाणात समाजकंठकामार्फत डेब्रिज टाकण्यात आले होते.<br>• सदर ठिकाणचे शेड काम सुरु करणेपूर्वी अतिक्रमण विभागामार्फत निष्कासीत करुन अतिरिक्त डेब्रिज ठेकेदारामार्फत सदर ठिकाणावरुन काढून घेण्यात आलेले आहे.<br>• सदर जगोवर नाल्यामध्ये पडलेले डेब्रिज ठेकेदारामार्फत काढून घेण्यात आले असून नाला पुर्ववत करण्यात आलेला आहे.<br>• सदर रेल्वेलाईन लगत MMRDA चे मंजूर निविदाकार मे. धनलक्ष्मी डेव्हलपर्स यांचे विटाका ते ठाणे स्कायवॉक बांधण्याचे काम सुरु असून सदर कामासाठी लागणारे साहित्य, मशिनरी तयार करणेकामी संबंधीतांमार्फत सदर ठिकाणी भराव घालण्याचे काम सुरु आहे.<br>• सदर ठिकाणी ठाणे महानगरपालिकेमार्फत कांदळवनाजवळ कोणतेही काम सुरु नाही. महापालिकेमार्फत बफर झोनमध्ये भविष्यात ग्रिन झोन तयार करण्याचे प्रस्तावित आहे.<br>• त्या अनुषंगाने तक्रारदार यांनी तक्रारीत नमूद केलेली बाब महापालिकेशी निगडीत नसून ती MMRDA यांच्याशी निगडीत आहे. | जिल्हाधिकारी ठाणे आणि ठाणे महानगरपालिका<br>**(अहवाल प्राप्त)** |
| ५३ | **तक्रार क्र. १०९ श्री. रोहीत जोशी दि.०८.१२.०१९**<br>कोलशेत येथे खाडीकिनारी कांदळवनाशेजारी बेकायदेशीर रित्या कॉंक्रीटचे बांधकाम केल्याबद्दल ठामपा वर कारवाई करणेबाबत. | • या तक्रारीबाबत ठाणे महानगरपालिका यांच्या अहवालानुसार सदरचे काम हे ठाणे स्मार्ट सिटी लि. यांचे मार्फत सुरु नसून सदरचे काम हे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचे मार्फत सुरु आहे. तसेच याबाबत मेरी टाईम बोर्डाकडे चौकशी केली असता सदर बांधकामाबाबत पर्यावरण विभागाची पनवानगी प्राप्त असल्याचे सांगण्यात आले आहे. | जिल्हाधिकारी ठाणे आणि ठाणे महानगरपालिका<br>**(अहवाल प्राप्त)** |

## नवीन प्राप्त तक्रारी

| अ. क्र. | तक्रारदार व तक्रारीचा विषय | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|
| १ | **तक्रार क्र. ११०** श्री. प्रसाद खाले दि. 18.11.2019<br>Destruction of Mangroves for pipeline work in Mankhurd | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>३. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक,मुंबई. |
| २ | **तक्रार क्र. १११** श्री. सुकांत कॉल दि.23.12.2019<br>Mangrove Destruction | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |
| ३ | **तक्रार क्र. ११२** श्री. संय्यद अब्बास रिझवी दि.25.12.2019<br>Complaint against blatant destruction of Mangroves by dumping debris and for carryingout unauthorized and illegal construction of RCC building on mangroves land in CRZ 1 Sensitive zone for which a STOP WORK NOTICE UNDER SECTION 354 (A) MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT Notice No.:PN/DO5PN/049/354A-MMC ACT/PN542N01/13-11-2019 Date: 13/11/2019 Ref No.: 100978 was issued by building and factory department of P/North Ward, Malad West, Mumbai. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>३. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई. |
| ४ | **तक्रार क्र. ११३** बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार दि.25.12.2019<br>JNPT violates CRZ norms, destroys mangroves | जिल्हाधिकारी, रायगड |
| ५ | **तक्रार क्र. ११४** श्रीमती कस्तुरी गांधी दि.26.12.2019<br>Destruction of Mangroves at NMSEZ at Panje Wetlands, Uran. | जिल्हाधिकारी, रायगड |
| ६ | **तक्रार क्र. ११५** श्री. सुनील अगरवाल दि.30.12.2019<br>Destruction of Mangroves in Sector 60, Nerul under CIDCO jurisdiction | जिल्हाधिकारी, ठाणे |
| ७ | **तक्रार क्र. ११६** श्री. सुनील अगरवाल दि.04.12.2020<br>Mangrove and wetlands destruction near Hiranandani Estate Thane | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका, जि. ठाणे.<br>३. सहाय्यक वनसंरक्षक, ठाणे. |
| ८ | **तक्रार क्र. ११७** श्री. संतोश डॅनिअल दि.15.01.2020<br>Encroachment on Mangroves Land in Sect-12 Ghansoli | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका, जि. ठाणे.<br>३. सहाय्यक वनसंरक्षक, ठाणे. |
| ९ | **तक्रार क्र. ११८ श्री.हरीश पांडे दि.25.01.2020**<br>large scale CRZ 1 reclamation & mangroves destruction in Ganpat Patil Nagar in Dahisar, Mumbai | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>३. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक |

| | | |
|---|---|---|
| १० | **तक्रार क्र. ११९ श्री.हरीश पांडे दि.**25.01.2020<br>**Reclamation of wetlands at Dharma Nagar, Borivali West** | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. निवासी  उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>३. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक |
| ११ | **तक्रार क्र. १२० श्री.हरीश पांडे दि.**25.01.2020<br>**mass scale reclamation of Wetlands & Mangroves next to Eskay Club, Borival** | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. निवासी  उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |